सन २०२६-२७ करिता मुख्यलेखाशीर्ष २०५२-सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०), सचिवालय (००) (११) ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी सेतू महाराष्ट्र संस्थेला सहायक अनुदान (२०५२ ०५८२) (कार्यक्रम) खालील ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर) या तपशीलवार शीर्षाखालील मंजूर अनुदानातून निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग
शासन निर्णय क्र.मागणी-२०२६/प्र.क्र.२८२/TECH-१ (E-१९३०७७३)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २० नोव्हेंबर, २०२६

संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय क्रमांक. SDC-२०२६/C.R.३०/IT, दि.२०/०३/२०२६
२. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची ई-नस्ती क्र.-१८१०५१८

प्रस्तावना:

नागपूर येथे Disaster Recovery Centre (DR Site) स्थापन करण्यास तसेच त्याकरिता येणाऱ्या खर्चास उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर बाबीसाठी झालेला खर्च भागविण्याकरिता निधी वितरित करण्याबाबत वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सन २०२६-२७ करीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **एकूण रु. १८२.६६ कोटी (रुपये एकशे ब्याऐंशी कोटी सहासष्ठ लक्ष फक्त) (करासहित)** इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची ई-नस्ती क्र. १८१०५१८ वरील प्रस्तावास अनुसरून नागपूर येथे Disaster Recovery Centre (DR Site) स्थापन करण्यासंदर्भात झालेल्या कामाच्या अनुषंगाने देयक अदा करण्याकरिता होणारा खर्च भागविण्यास सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **रु.**

१८२.६६ कोटी (रुपये एकशे ब्याऐंशी कोटी सहासष्ठ लक्ष फक्त) (करासहित) इतका निधी खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

i. प्रस्तावित प्रकरणी देयकांची पडताळणी/तपासणी प्रक्रिया पूर्ण करुनच इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून देयके अदा करण्यात यावीत.

ii. सदर खर्चाच्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची जबाबदारी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची राहिल.

iii. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात येणार आहे, त्याकरिता खर्च करण्याची व निधी वितरीत करताना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याची दक्षता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून घेण्यात येईल.

iv. मागणी केलेल्या निधीची रक्कम उचित असल्याची खातरजमा करून कोणत्याही परिस्थितीत मंजूर मर्यादेपेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता आयुक्तालयाने घ्यावी.

v. प्रत्यक्ष देयके अदा करण्यापूर्वी MSA मधील निकषा प्रमाणे Milestone नुसार व अपेक्षित गुणवत्तेनूसार काम झालेले आहे याबाबतचे कार्यपूर्ती प्रमाणपत्र घेण्यात यावे. या सर्व बाबींची खात्री करण्याची जबाबदारी पूर्णपणे आयुक्तालयाची राहील.

vi. कार्यादेशामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती, कामाची व्याप्ती (Scope of Work), देयक अदा करण्याच्या अटी, सेवा स्तर करार (SLA), दंडात्मक तरतुदी (Penalty Clauses), कामातील विलंबाबाबतची जबाबदारी, हमी व दोष दायित्व कालावधी (Warranty / Defect Liability) तसेच माहिती व सायबर सुरक्षेसंबंधीच्या तरतुदींची तपासणी आयुक्तालयाने करावी.

vii. निधी वितरणात कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची खात्री करूनच देयके अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी आयुक्तालयाची राहील.

२. उक्त नमुद बाबींसाठी होणारा खर्च हा नेमून दिलेले "लेखाशिर्ष मागणी क्रमांक ए-४, "मुख्यलेखाशीर्ष २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०)-सचिवालय (००) (११) ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी सेतू महाराष्ट्र संस्थेला सहायक अनुदाने (२०५२ ०५८२) (कार्यक्रम) खालील ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या उद्दिष्टाखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो वित्तीय वर्ष सन २०२६-२७ साठी मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्याकरीता अधिदान व लेखा कार्यालयातून आहरीत करण्यासाठी **आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय** यांना नियंत्रक अधिकारी तसेच **लेखा अधिकारी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय** यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका (भाग-१) १९७७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या **अनौ.सं.क्र.६२९/व्यय-४, दि.२७/१०/२०२६** अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६११२०१०५५३९००११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA
MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE98A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.11.20 10:56:51 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांचे स्वीय सहायक, मुंबई.
३) उपसचिव (अर्थसंकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७) वित्त विभाग, कार्यासन अर्थसंकल्प, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
८) रोखशाखा (३ प्रती), इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई
९) निवडनस्ती